# कॅराव्हॅन पर्यटन धोरण

**प्रस्तावना:**

महाराष्ट्राला वैविध्यपुर्ण सौदर्य लाभले आहे. निसर्गरम्य समुद्र किनारे, ऐतिहासिक किल्ले, पर्वतरांगा, थंड हवेची ठिकाणे, नदी, वनसंपदा, ऐतिहासिक वारसास्थळे, लेणी, धरणे अशी अनेक वैशिष्ट्यपुर्ण पर्यटनाची ठिकाणे आहेत. अशा ठिकाणी कॅराव्हॅन पर्यटनाकरीता मोठा वाव आहे.

तसेच अतिदुर्गम भागात हॉटेल, रिसॉर्ट सारख्या राहण्याच्या सोयी अत्यंत कमी प्रमाणात उपलब्ध आहे. ज्या प्रतिबंधित क्षेत्रामध्ये कायमस्वरुपी बांधकामासाठी प्रतिबंध घालण्यात आले आहेत अशा ठिकाणी कॅराव्हॅन व कॅम्परव्हॅनच्या साहाय्याने पर्यटकांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देता येतील. शिवाय जेथे सध्या पक्के बांधकाम असलेल्या निवास व्यवस्था उपलब्ध नाहीत अशा ठिकाणी कॅराव्हॅन पर्यटन करता येईल.

आंतरराष्ट्रीय ट्रॅव्हेल हाऊस 2017 च्या अहवालानुसार भारत आजही कॅराव्हॅन पर्यटनासंदर्भात बाल्य अवस्थेत आहेत. आजही विलासी वास्तव्यासाठी पर्यटक हॉटेलमध्ये पांरपारिक मुक्काम करणे पसंत करतात.

महाराष्ट्राच्या पर्यटन धोरण-2016 मध्ये देखील कॅराव्हॅन पर्यटन या संकल्पनेचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार मनोरंजन वाहन (Recreational Vehicle) कॅम्पर व्हॅन्स, मोटार होम्स सारख्या वैशिष्ट्यपुर्ण बांधणी केलेल्या वाहनांचा कॅराव्हॅन पर्यटनामध्ये समावेश करण्यात आला आहे.

**धोरणाचे उद्दिष्ट:**

1. पर्यटन धोरण -2016 अंतर्गत कॅराव्हॅन पर्यटनाची जी संकल्पना दिलेली आहे त्या संकल्पनेची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणेसाठी मार्गदर्शक सुचना.
2. पर्यटनाच्या वैशिष्ट्यपुर्ण ठिकाणी पर्यटकांच्या राहण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे.
3. खाजगी गुंतवणूकीस प्रोत्साहन देऊन पर्यटकांना सुविधा देणे.
4. कौटुंबिक सहलींच्या आयोजनासाठी प्रोत्साहन देणे.
5. निर्सग जवळुन अनुभवण्याची संधी असलेल्या ठिकाणी पर्यटकांना राहण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे.
6. हॉटेल, रिसॉर्ट या पारंपारिक निवास व्यवस्थेपेक्षा नाविन्यपुर्ण अनुभव पर्यटकांना उपलब्ध करुन देणे.

7. नवीन पर्यटन स्थळांचा शोध व दुर्गम स्थळी पर्यटकांना राहण्याची सुविधा, येथील पर्यटनाचा विकास व स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना.
8. “ना विकास क्षेत्राचा” व्यावसायिक गतिविधी करिता वापर करण्यास संधी.
9. कमी गुंतवणूक जास्त आर्थिक लाभ.
10. दुर्गम भागातील पर्यटनाला चालना.
11. रोजगाराची संधी
12. ज्या ठिकाणी निवासाची सोय नाही त्या ठिकाणी निवास व्यवस्था उपलब्ध.

**धोरणाची व्याप्ती**

महाराष्ट्रातील विपुल प्रमाणात असलेल्या संसाधनांचा उत्तमरित्या वापर करुन कॅराव्हॅन व कॅराव्हॅन पार्क या सुविधा पर्यटकांना उपलब्ध करुन देण्यासाठी हे धोरण करण्यात येत आहे. हे धोरण संपुर्ण महाराष्ट्र राज्याला लागु राहील.

# भाग - 1

## कॅराव्हॅन पार्क

### संकल्पना व संज्ञा

"कॅराव्हॅन पार्क - मुलभुत सोयी सुविधांनी युक्त अशी जागा जेथे कॅराव्हॅनकरिता निश्चित केलेल्या ठिकाणी कॅराव्हॅन उभी करुन मुक्काम करता येतो. अशा पार्कमध्ये लहान मोठ्या आकाराच्या कॅराव्हॅन उभी करण्याची व्यवस्था असते."

"हायब्रीड कॅराव्हॅन पार्‌क - यामध्ये एकाच ले आऊटमध्ये एका भागात कॅराव्हॅन पार्क व उर्वरित जागेत रिसॉर्ट, मनोरंजन उद्यान, साहसी उपक्रम, वॉटर पार्क, तंबुची कॅंपींग साईट, निसर्ग उद्यान, कृषी पर्यटन यांसारखे एक किंवा अनेक उपक्रम असतील."

### कॅराव्हॅन पार्क करिता जमीन:

- कॅराव्हॅन पार्क ही प्रामुख्याने खाजगी जमिनीवर व स्वत: जमीन मालक अथवा विकासक उभारु शकतील.
- जास्तीत जास्त 20 पार्किंग बे करिता कमीत कमी 1 हेक्टर जमीन आवश्यक आहे.
- वेगवेगळ्या आकाराच्या कॅराव्हॅन पार्क थांबु शकतील अशी कॅराव्हॅन पार्कची रचना असणे आवश्यक आहे.
- कॅराव्हॅन पार्क करता जमीन ही पठारी प्रदेशावर (टेबल लॅंड) हवी.

### कॅराव्हॅन पार्कची जागा व पार्कचा आराखडा:

- कॅराव्हॅन पार्कची जागा व त्याकरिताचा आराखडा सभोवतालच्या परिसराशी सुसंगत असणे आवश्यक.
- मुलांकरिता मनोरंजानकरिता पुरेशी सोय असणे आवश्यक आहे.
- योग्य सांडपाणी व्यवस्था, रेन वॉटर हार्वेस्टिंग व्यवस्था, पिकनिक टेबलची व्यवस्था असणे आवश्यक.
- सर्व प्रकारच्या हवामानाशी सुसंगत असे बांधकाम असणे आवश्यक आहे. कॅराव्हॅन पार्कचा ले आऊट सर्व प्रकारच्या व्यावसायिक गरजा पुर्ण होऊ शकतील असे असावे.

### अंतर्गत रस्ते:

- सुरक्षितरित्या कॅराव्हॅन पार्कशी सुसंगत व योग्य त्या रुदीचे अंतर्गत रस्ते असावे.
- पाण्याचा योग्य प्रकारे निचरा होईल असे अंतर्गत रस्ते असावे.
- रस्त्याच्या दोन्ही बाजुस वृक्ष लागवड करण्यात यावी.

**वाहनतळ व्यवस्था:**

वाहनतळी खालील सुविधा असणे आवश्यक आहे.

- एक तरी पार्किंग बे हे 15 मी × 6 मी. (डोंगराळ व उंचीच्या ठिकाणी) व बाकीचे 7.5मी× 5मी चे असावे.
- थांब्याच्या ठिकाणी दोन कॅराव्हॅनमध्ये कमीत कमी 5 मीटरचे अंतर असावे.
- प्रत्येक पार्किंग बे स्वतंत्ररित्या सिमांकित केलेले असावे व ते थेट अंतर्गत रस्त्याला जोडलेले असावे.
- पार्किंग बे जमीनीपासुन किमान 6 इंच उंच असावे.
- पार्किंग बे चे बांधकाम पक्के असावे.
- प्रत्येक पार्किंग बे ला स्वतंत्ररित्या पाणी व वीज जोडणी असावी तसेच पर्यावरणीय मानदंडानुसार सांडपाण्याची व्यवस्था असावी.
- प्रत्येक पार्किंग बे लगत लँडस्केपिंग असावी तसेच पर्यटकांना मनोरंजानाकरिता सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.

**पर्यटक सुविधा केंद्र:**

I. पर्यटकांच्या गरजा लक्षात घेवुन पर्यटक सुविधा केंद्राची बांधणी करण्यात यावी.
II. पर्यावरणपुरक साधनांनी पर्यटक सुविधा केंद्राचे बांधकाम असावे. शक्यतो पर्यटक सुविधा केंद्र जमीनीपासुन जास्त उंचीवर नसावे.
III. पर्यटक सुविधा केंद्रातील कर्मचारी प्रशिक्षित असावा. कर्मचाऱ्यांकरिता ड्रेस कोड असावा. फ्रंट ऑफिसमधील कर्मचाऱ्यास इंग्रजीचे ज्ञान असावे.
IV. काय करावे, काय करु नये याची यादी दर्शनीय भागात लावण्यात यावी.
V. किमान एक इलेक्ट्रीशियन, प्लंबर व सफाई कामगार 24 तास सेवा देण्यासाठी असावा.
VI. कॅराव्हॅन पार्कमध्ये व्यवस्थित वीज पुरवठा असावा. अपारंपारिक उर्जा स्त्रोताचा वापर करण्यात यावा.
VII. स्थानिक नकाशे / ब्राऊशर पर्यटकांना उपलब्ध करुन देण्यात यावे.
VIII. स्थानिक पर्यटक मार्गदर्शक (गाईड) सोबत टायअप करण्यात यावे.

IX. वेटिंग रुम, रेस्ट रुमची सुविधा असावी.
X. नजीकच्या दवाखान्याबद्दल माहिती असावी.
XI. पर्यटक सुविधा केंद्राचे बांधकाम योग्य सुविधा व पायाभूत सुविधांद्वारे केलेले असावे.
XII. पर्यटक सुविधा केंद्राचे डोंगराळ भागात नवीन इमारतींचे आर्किटेक्चर आणि पर्यावरणीय दृष्ट्या नाजूक भागात विचारात घेऊन सर्जनशील आर्किटेक्चरचा समावेश केला पाहिजे
XIII. टिकाऊपणा आणि उर्जा कार्यक्षमता आणि शक्य तितक्या स्थानिक कला अनुरूप आणि स्थानिक सामग्रीच्या वापरासह आर्किटेक्चरला प्राधान्य असावे.
XIV. केवळ ग्राउंड लेव्हल पुरते मर्यादित.

**लँडस्केपिंग:**

- लँडस्केपींग असावे, पर्यटकांची सुरक्षा, एकांत यांचा विचार करुन लँडस्केपिंग व रोडच्या बाजुला वृक्षांची लागवड करणे गरजेचे आहे तसेच गार्डन असावे.
- एकुण जागेच्या किमान 10% जागा ओपन स्पेस रिक्रिएशन असणे आवश्यक आहे. (किंवा स्थानिक ठिकाणाच्या नगररचना विभागाच्या नियमाप्रमाणे जे असेल ते )
- स्थानिक व देशी वृक्षांचा वापर लागवडीकरिता करणे.
- धूळ, वारे, आवाजाचा त्रास होणार नाही अशा पद्धतीचे लँडस्केपिंग असणे आवश्यक आहे. सिंचन व इतर वापराकरिता पुरेसे पाणी साठवणुकीची सोय असणे गरजेचे आहे.
- सुरक्षेच्या दृष्टीकोनाचा विचार करुन ओपन स्पेस रिक्रिएशन करिता जागा निवडावी.

**कॅराव्हॅन पार्क परिचालनाकरिता आवश्यक / बंधनकारक बाबी.**

i. कॅराव्हॅन पार्क प्रामुख्याने खालीलपैकी एका ठिकाणी असावे.
   - जंगलाचा बफर झोन.
   - किल्ल्यांचा पायथा.
   - हिल स्टेशन.
   - धरण परिसर.
   - गुहा परिसर.

ii. पर्यटन हंगामात कॅराव्हॅन पार्क 24× 7 सुरू असावे.
iii. मुख्य रस्त्यापासुन कॅराव्हॅन पार्क कडे जाणारा पोहच रस्ता सुस्थितीत असावा.
iv. पिण्याच्या पाण्याची व वापराच्या पाण्याची सोय असावी.
v. पुरेसा वीज पुरवठा असावा, वीज पुरवठा खंडीत झाल्यास बॅकअपची ही सूविधा असावी.
vi. जागेस कंपाउंड असावे व पुरेसे सुरक्षा रक्षक असावेत.
vii. पर्यटक सुविधा केंद्राच्या ठिकाणी वाहनांच्या दुरूस्तीचे साहित्य, प्रथमोपचार सुविधा, फुड स्टॉल, उपहारगृह असावे.
viii. अग्नि रोधक यंत्र असावे.
ix. आसपासच्या पर्यटन स्थळांची माहिती उपलब्ध असावी.

**वैकल्पिक बाबी :-**

1. हायब्रीड पार्कच्या बाबतीत पार्किंग सुविधा, लाँड्रीची व्यवस्था, सीसीटीव्ही, गाईडची सुविधा, अभीगतांसाठी वेटींग लाऊंज, वाहन चालकांसाठी राहण्याची स्वतंत्र व्यवस्था, स्थानिक सांस्कृतिक कार्यक्रम दाखविण्याची सोय असावी.
2. कॅराव्हॅन पार्क चालकांनी पर्यटकांना सुरक्षित, जबाबदार अनुभवजन्य पर्यटन देता येईल असा प्रयत्न करावा.
3. रेन वॉटर हार्वेस्टिंग व पिकनिक टेबलची व्यवस्था असावी.
4. लहान मुलांच्या खेळण्याचे व मनोरंजनाचे साहित्य उपलब्ध असावे.
5. कॅराव्हॅन पार्क निर्माण करताना सभोवतालच्या निसर्गाशी एकरुप होण्याचा अनुभव यावा अशा पद्धतीने विकसीत करावे.
6. कॅराव्हॅन पार्कचे प्लॅनिंग करताना पर्यटकांचे खाजगीपण जपणे व सुरक्षितता विचारात घेऊन करावे.
7. खाजगी उद्योजक कॅराव्हॅन पार्कची उभारणी करु शकतील.
8. लाँड्री ची सुविधा असावी.

**सुरक्षितता (Safety & Security)**

कॅराव्हॅन पार्क मालकांनी पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने खालील अनिवार्य बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

1. अनधिकृत प्रवेश टाळण्यासाठी कॅराव्हॅन पार्क चारही बाजुंनी कुंपणाने सुरक्षित असणे आवश्यक आहे. पुरेशी सुरक्षा उपाययोजना असणे, जसे. सुरक्षा रक्षक, सीसीटीव्ही.
2. प्रथमोपचार साहित्य असणे आवश्यक असुन प्रथमोपचारांबाबत प्रशिक्षित कर्मचारी वर्ग असणे आवश्यक आहे.
3. डॉक्टर ऑन कॉल ची सुविधा कॅराव्हॅन पार्क मध्ये असणे आवश्यक आहे.
4. निकडीच्या काळात वैद्यकीय सुविधा असणारी यंत्रणा असणे आवश्यक आहे.
5. कॅराव्हॅन पार्क मालकांनी स्थानिक वैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क ठेवणे आवश्यक आहे.
6. आग, अपघात, भुकंप, पूर सारख्या आपत्तीचा सामना करण्यासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची व्यवस्था करणे तसेच कॅराव्हॅन पार्कमधील कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणे अनिवार्य आहे.
7. सुरक्षेची जबाबदारी आयोजक व मालकाची संयुक्त जबाबदारी असेल.
8. कॅराव्हॅन पार्कचे प्रवेशद्वार हे मर्यादित असावेत जेणेकरुन अवैधरित्या पार्कच्या जागेत कोणी प्रवेश करणार नाही.
9. नैसर्गिक आपत्ती व तातडीच्या वैद्यकीय सेवा याबाबतची परिस्थिती हाताळण्याची कार्यपद्धती कॅराव्हॅन पार्कच्या व्यवस्थापनाने केलेली असावी.
10. कॅराव्हॅन पार्क मालकांनी पावसाळ्यात पूर परिस्थितीचा विचार करुन सुरक्षित ठिकाणी पार्किंग करावे.

**स्वच्छता:**

I. 24 तास पाण्याच्या सुविधेसह पुरुष व महिलांकरिता स्वतंत्र स्वच्छतागृहांची पुरेशी सोय असावी.
II. वाहन चालकांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह असावे.
III. स्वच्छतागृहात कपडे बदलण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असावी. वॉश बेसीन, आरसा इतर सुविधांनी युक्त स्वच्छतागृह असावे.
IV. विकलांगांकरिता स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्था असावी.
V. कॅराव्हॅन पार्कमध्ये 10 पेक्षा जास्त पार्किंग बे असतील तर त्या प्रमाणात स्वच्छतागृहाची संख्या असावी.
VI. स्वच्छतागृहामध्ये पर्यावरण पुरक सुविधा (Eco Toilets) असल्या पाहिजेत.

VII. टाकाऊ पदार्थांचा पुर्नवापर करुन पर्यावरणाच्या दृष्टीने योग्यतो वापर केला पाहिजे.

VIII. स्वयंपाक घरातील कचरा विल्हेवाट लावण्यासाठी कंपोस्टिंगला प्रोत्साहित केले पाहिजे.

IX. सांडपाण्याची विल्हेवाट व्यवस्थित व पर्यावरणास अनुकूल मार्गाने करण्यात यावी.

X. स्वच्छतागृहाची दिवसातुन कमीत कमी 2 वेळा स्वच्छता करण्यात यावी.

XI. कचरा व्यवस्थापन स्थानिक ग्रामपंचात व प्राधिकरणे यांनी त्यांचे स्तरावर करावे.

XII. कोणत्याही स्वरूपाचा कचरा जाळणे किंवा त्याची विल्हेवाटलावणेअनुज्ञेय नाही

XIII. “धुम्रपान निषेध व थुंकू नये”/ स्वच्छ परिसर व प्लॅस्टीकमुक्त ठेवणे यांसारखे संदेश दर्शविणारे फलक दर्शनी भागात लावणे.

XIV. विघटनशील व अविघटनशील कचऱ्याकरिता स्वतंत्र चार कचरापेट्या ठेवणे अनिवार्य तसेच 50 लिटर क्षमतेच्या - काळा (कोरडा कचरा), हिरवा (ओला कचरा) आणि निळा (प्लॅस्टिक) कचरापेटी ठरावीक ठिकाणी ठेवणे.

**विकलांगांकरिता तरतुद:**

- कॅराव्हॅन पार्कमध्ये व्हिलचेअर असणे आवश्यक आहे तसेच विकलांग व्यक्तींना सहजरित्या फिरता यावे अशी कॅराव्हॅन पार्कची रचना असावी.

**आवश्यक परवानगी**

1. कॅराव्हॅन पार्कसाठी स्थानिक प्राधिकरणांच्या विकास नियंत्रण नियमावली नुसार ले-आउट तसेच बांधकाम परवानगी असावी.
2. कॅराव्हॅन पार्कने स्थानिक स्वराज्य संस्थांचे सर्व नियम पाळावेत.
3. कॅराव्हॅन पार्क उभारण्यासंदर्भात नियोजन प्राधिकारी यांची परवानगी असावी.
4. पोलिसांचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक (N.O.C)
5. खाद्यगृह परवाना (फुड लायसन्स) आवश्यक.
6. वन विभाग, जलसंपदा विभाग, M.T.D.C, त्या-त्या विभागांच्या जमीन धोरणानुसार उभारता येईल.
7. पर्यटन संचालनालय, वन विभाग, जलसंपदा विभाग, M.T.D.C या विभागांच्या कॅराव्हॅन पार्कसाठी आवश्यक परवानग्या घ्याव्या लागतील.
8. आवश्यकतेप्रमाणे पर्यावरण विभागाची परवानगी/ ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे.

# भाग - 2

## कॅराव्हॅन

### संकल्पना व संज्ञा

“कॅराव्हॅन - बेडची सुविधा असलेले व किचन, टॉयलेट, सोफा, टेबल यांसारख्या वैकल्पिक सुविधा असलेले वाहन होय.

“प्रवास, विश्रांती व निवासाच्या उद्देशाने वैशिष्ट्यपुर्ण बांधणी करण्यात आलेले वाहन म्हणजे कॅराव्हॅन, यामध्ये Recreational Vehicles, कॅम्परव्हॅन, मोटार होमचा समावेश होतो.”

कॅराव्हॅनमुळे प्रवास, राहणे, जेवणे व पर्यटन स्थळी सफारी करणे शक्य असल्याने कौटुंबिक सहलीचा आनंद घेता येतो. पुरेशी राहण्याची व्यवस्था नसलेल्या पर्यटन स्थळी कौटुंबिक सहली आयोजित करण्यास चालना मिळते.

## कॅराव्हॅनचे प्रकार

जगभरात अनेक प्रकारच्या कॅराव्हॅनचा वापर केला जातो. कॅराव्हॅनचे प्रकार खालीलप्रमाणे आहेत:

1) सिंगल एक्सेल कन्व्हेंशल कॅराव्हॅन :
   3 आणि 6.5 मीटर लांबीच्या 2 व 6 लोक झोपु शकणारे कॅराव्हॅन. यामध्ये बेड, खुर्ची, टेबल, स्वच्छतागृह, स्नानगृह व स्वयंपाकाची सुविधा असते.

2) ट्विन एक्सल कॅराव्हॅन:
   मोठ्या कॅराव्हॅनला अतिरिक्त एक एक्सल बसविले जाऊ शकते. यामुळे मोठ्या लक्झरी कॅराव्हॅनला स्थिरता मिळु शकते. जास्त लांबीच्या कॅराव्हॅनमुळे अतिरिक्त जागा उपलब्ध होऊन जास्तीच्या सुविधा निर्माण करता येवु शकतात.

3) टेन्ट ट्रेलर:
   टेन्ट ट्रेलर कारच्या मदतीने एका ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाता येते. टेन्ट ट्रेलर वेगवेगळ्या लांबीच्या व विविध साधनांनी युक्त असुन ते सहजपणे घडी घालुन (Fow) नेता येते.

4) फोल्डिंग कॅराव्हॅन:
   जागेची समस्या असेल तर फोल्डिंग कॅराव्हॅनचा वापर सहजपणे करता येतो.

5) कॅम्पर ट्रेलर:

कॅम्पर ट्रेलर हे टेन्ट ट्रेलर सारखेच असतात. कॅम्पर टेलरमध्ये अतिरिक्त टेन्ट बर्थची सोय असते. टेन्ट ट्रेलर प्रमाणे सर्व सुविधा कॅपर ट्रेलर मध्ये असतात.

6) याव्यतिरिक्त अमेरिकन एअर स्ट्रीम Fifth Wheeler,मोटार होम, टाइनी टियर ड्रॉप ट्रेलर, असे प्रकार आढळतात.

या सर्व प्रकारांच्या कॅराव्हॅनसाठी हे धोरण लागु राहील.

**कॅराव्हॅन / कॅपरव्हॅन संबंधी मुलभुत अनिवार्य बाबी.**

1. सोफा कम बेड (2 व्यक्तींकरीता) झोपण्याची व्यवस्था असावी.
2. थंडपेय व स्नॅकची सुविधा असावी.
3. वातानुकुलित यंत्रणा.
4. External Barbecue points.
5. टो टोच स्टेबिलायझर्स असावे.
6. रेडिओ /सी.डी/ डीव्हीडी/ एमपी थ्री प्लेअर.
7. मोबाईल चार्जिंग सुविधा.
8. जीपीएस प्रणाली.
9. फ्रिज, मायक्रोव्हेव सह पाकगृह.
10. वीज पुरवठा बॅटरी किंवा बाह्य हुक अप द्वारे करण्याची सुविधा असावी.
11. गॅस / वीजेवर चालणारे वॉटर हीटर असावे.
12. स्वच्छतागृह पुरेशा पाण्यासह शॉवर व हँड शॉवरची सुविधा असावी.
13. प्रथमोपचाराची सुविधा असावी.
14. कॅराव्हॅन पार्क करण्यासाठी पॉवर व्हील मूवर सिस्टम (Integrated or clip-on) असावे.
15. वाहन चालक व प्रवासी यांच्यात संवादाकरिता स्वतंत्र व्यवस्था.
16. खाण्याचे टेबल (Dining Table)
17. ग्रेवाटर (वॉशवॉटर) आणि ब्लॅक वॉटर (सीवेज) साठी वेगळ्या सांडपाण्याच्या टाक्या असाव्यात.

**वैकल्पिक बाबी**

1. चांदणी (Awning) किंवा स्क्रीन रूम.
2. वॉशिंग मशीन व क्लॉथ ड्रायर.
3. खेळण्यासाठी पुरेसे साहित्य.
4. कॅराव्हॅनच्या मागे सायकल ठेवणेसाठी सुविधा.
5. पर्यटकांना ऐषाआरामाच्या सुविधा.
6. कॅराव्हॅन मध्ये तंबुचे साहित्य.

**सर्वसाधारण सुचना.**

1. कॅराव्हॅन ऑपरेटरांनी पंढरपुर वारी, नाशिक कुंभमेळा व महाराष्ट्रातील मोठ्या यात्रा अशा ठिकाणी प्राधान्याने त्या-त्या कालावधीत परिचालन करावे.
2. जर कॅराव्हॅन पर्यटक स्वत: चालवित नेणार असतील तर त्या पर्यटकास सेल्फ ड्राईव चा अनुभव असावा.
3. अद्ययावत भारतीय वाहन मानंकानुसार वाहन असावे.
4. कॅराव्हॅन ऑपरेटरने ऑनलाईन बुकिंग सुविधा द्यावी.
5. कॅराव्हॅन ही नोंदणीकृत कॅराव्हॅन पार्क मध्ये ज्या विभागांनी वाहन पार्किंगसाठी परवानगी दिली आहे अशाच ठिकाणी मुक्कामासाठी पार्क करता येईल.
6. वाहन चालकास गाडी चालविण्याचा अनुभव असावा, वाहन चालविण्याचा परवाना असावा, निर्व्यसनी असावा.
7. परिवहन व वाहतुक विभागाचे नियम पाळणे बंधनकारक असावे.
8. कॅराव्हॅन मध्येच बंद पडली तर आसपासच्या गॅरेजची तसेच मेकॅनिकची माहिती जलदगतीने वाहन चालकास द्यावी.
9. कॅराव्हॅन खाजगी उद्योजकांच्या मालकीच्या असतील.
10. अपघात झाल्यास नजीकच्या पोलिस ठाणे, हॉस्पिटल ला कळविणे.
11. रात्रीचा मुक्काम वगळता कॅराव्हॅन विविध निसर्गरम्य पर्यटनस्थळी नेता येईल.

# भाग - 3

**इतर सर्वसाधारण बाबी:**

1. माहिती फलक असावा.
2. कॅराव्हॅन, कॅराव्हॅन चालक, कॅराव्हॅन पार्क या बाबींचा Third Party Insurance असावा.
3. आयुक्त, परिवहन विभाग यांचेकडे आवश्यक ते शुल्क भरुन (कॅराव्हॅन) वाहनांची नोंदणी करावी.
4. कॅराव्हॅन पार्कमध्ये वृक्ष लागवड करताना शक्यतो स्थानिक झाडे लावण्यात यावीत.
5. कॅराव्हॅन पार्किंग करताना रहदारीचा प्रश्न येऊ शकतो, त्यामुळे कॅराव्हॅन फिरविणे/वळविणेसाठी पुरेशी जागा उपलब्ध असली पाहीजे अशा रीतीने कॅराव्हॅन पार्कची रचना केलेली असावी.
6. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे पर्यटक निवास व परिसरामध्ये भाडे करार कॅराव्हॅन पार्किंग करता येईल.

**पर्यटन विभाग देत असलेले लाभ**

1. पर्यटन धोरण – 2016 अंतर्गत कॅराव्हॅन पार्क / कॅराव्हॅन पर्यटनाकरिता उपलब्ध प्रोत्साहने जसे की, मुद्रांक शुल्कामध्ये सुट, राज्य वस्तु व सेवा कराचा परतावा, विद्युत शुल्कामध्ये सुट लागु राहील.
2. पर्यटन धोरण – 2016 अंतर्गत कॅराव्हॅनसाठी बँकेकडुन कर्जपुरवठा होणेसाठी पर्यटन संचालयाचे ना हरकत प्रमाणपत्र दिले जाईल.
3. महाराष्ट्रातील निसर्ग पर्यटनाची प्रसिद्धी.
4. शाश्वत पर्यटन / जबाबदार पर्यटनाला चालना.
5. कॅराव्हॅन खाजगी उद्योजकांच्या मालकीच्या असतील.
6. कॅराव्हॅन पार्किंग जागांकरिता पर्यटन संचालनालय सुलभीकरण प्रयत्न करेल.
7. अति प्राधान्य असलेल्या भागात 10 एकर पेक्षा जास्त क्षेत्रावर कॅराव्हॅन पार्क उभारल्यास त्या ठिकाणी रस्ता व अन्य पायाभुत सुविधांसाठी पर्यटन विभाग राज्य शासनाच्या अन्य विभागाच्या माध्यमातुन प्रयत्न करेल.
8. कॅराव्हॅन मालक महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, या ठिकाणी कॅराव्हॅन पार्किंग करिता स्वतंत्ररित्या संबंधितांबरोबर करार करु शकतील.
9. कॅराव्हॅन पार्किंग जागांकरिता पर्यटन संचालनालयाच्या ना हरकत प्रमाणपत्रामुळे इतर विभागांच्या आवश्यक परवानग्या मिळणे सुलभ होईल.

**नोंदणी.**

1. कॅराव्हॅन व कॅराव्हॅन पार्क ची नोंदणी पर्यटन संचालनलयाकडे आवश्यक राहील.
2. कॅराव्हॅन पार्क व कॅराव्हॅन टुर ऑपरेटर यांची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने पर्यटन विभागामार्फत करण्यात येईल, महाराष्ट्र टुरिझमच्या www.maharashtratourism.gov.in या संकेतस्थळावर ही सुविधा असेल.
3. दर पाच वर्षांनी नुतनीकरण करण्यात येईल.
4. नोंदणी शुल्क रुपये पाच हजार व नुतनीकरणासाठी दोन हजार रुपये शुल्क असेल.
5. संचालक, पर्यटन संचालनालय यांचेमार्फत या धोरणाचे समन्वय व सनियंत्रण केले जाईल.

**प्रशिक्षण:**

1. वेळोवेळी मार्केटिंग, स्वच्छता, व्यवस्थापन याबद्दलचे प्रशिक्षण दिले जाईल.
2. पर्यटन संचालनालय कॅराव्हॅन पार्क व कॅराव्हॅन या दोन्ही घटकांचे पर्यटन व्यवसाय प्रभावीपणे चालविण्यासाठी खालील विषयाबाबत तज्ञ व्यक्तींमार्फत प्रशिक्षणाची सोय करेल.
   - जबाबदार व सुरक्षित पर्यटन
   - प्रभावी व्यवस्थापन
   - प्रसिद्धी व विपणन
   - आरोग्यदायी व स्वच्छता

**अनुभवजन्य पर्यटन** (Experiential Tourism)

1. निर्सगाला जवळुन अनुभवण्याची संधी असलेल्या ठिकाणी पर्यटकांची राहण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे.
2. हॉटेल, रिसॉर्ट या पारंपारिक निवासाच्या व्यवस्थेपेक्षा नाविन्यपुर्ण अनुभव पर्यटकांना उपलब्ध करुन देणे.

**रोजगार निर्मिती**

1. 80% स्थानिकांना रोजगारामध्ये प्राधान्य दिले जाईल.
2. कॅराव्हॅन व कॅराव्हॅन पार्क चे ऑपरेटर, मालक हे या दोन्ही ठिकाणी त्या – त्या जिल्ह्यातील रहिवास्यांना रोजगारामध्ये प्राधान्य देतील.

**प्रसिद्धी व विपणन:**

- पर्यटन संचालनालय कॅराव्हॅन पर्यटन प्रसिद्धी व प्रचालनाकरिता कार्य करेल. खाजगी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न पर्यटन संचालनालयामार्फत करण्यात येईल. याकरिता सुलभीकरण कक्ष पर्यटन संचालनालयांतर्गत स्थापित करण्यात येईल.
- मान्यताप्राप्त कॅराव्हॅन पार्कची प्रसिद्धी पर्यटन विभागाच्या संकेतस्थळावरुन करण्यात येईल. तसेच विविध समाज माध्यमांतुन वेगवेगळया इव्हेंट, रोड शो, प्रदर्शने (Exhibition), प्रेस मीट, फॅम ट्रीप च्या माध्यमांतुन प्रसिद्धी करण्यात येईल.
- कॅराव्हॅन पर्यटनाकरिता वेगवेगळया सर्किटची निर्मिती करण्यात येईल.
- कॅराव्हॅन पार्क व कॅराव्हॅन मालकांनी तयार केलेले व्हिडीओ यांची प्रसिद्धी केली जाईल.
- महाराष्ट्र पर्यटनच्या रोडशोच्या वेळी निवडक कॅराव्हॅन ऑपरेटरला संबंधित ठिकाणी नेण्यात येईल.

**शाश्वत पर्यटन:**

I. इको फ्रेंडली पद्धतीचा अवलंब करणे. (3R – Reduce, Reuse, Recycle)
II. स्थानिक संस्कृती, परंपरांचे जतन करणे.
III. जबाबदार पर्यटन धोरण अंगिकारणे.
IV. स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देणे.
V. स्थानिकांना पर्यटन विषयक बाबींमध्ये सामावुन घेण्यात यावे.

**सुलभीकरण:**

कॅराव्हॅन पर्यटनाच्या विकासासाठी खालीलप्रमाणे सुविधा सुलभीकरण (Facilitation) करण्यात येईल.

- महाराष्ट्रात पर्यटन क्षमता असलेल्या पर्यटन स्थळी कॅराव्हॅन पार्क करीता जमीन उपलब्ध करुन देणे:-
    - ✓ बफर झोन / जंगलाच्या निकटवर्तीय भागात.
    - ✓ किल्ल्यांच्या पायथ्यालगत
    - ✓ धरण / तलावालगत
    - ✓ ट्रेकींग / हायकींग स्थळाच्या पायथ्याशी
    - ✓ थंड हवेच्या ठिकाणी.

- महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, वन विभाग, जलसंधारण विभाग, महसुल व वन विभाग, व इतर संबंधित विभागकडुन कॅराव्हॅन पार्ककरिता जागा उपलब्ध करुन देण्यासाठी सर्वतोपरी मदत करणे.
- संबंधित विभागाकडुन ना हरकत प्रमाणपत्र/ परवानगी मिळविण्याकरिता मदत करणे.
- कॅराव्हॅन वाहन नोंदणी करिता मदत करणे.
- कॅराव्हॅन पार्क गुंतवणूकदाराने कॅराव्हॅन पार्कचा नकाशा संबंधित यंत्रणेकडुन मंजुर करुन घेणे आवश्यक आहे. याकरिता पर्यटन विभागाकडुन आवश्‍यक ती मदत करण्यात येईल.
- कॅराव्हॅन पार्क / कॅराव्हॅन वाहनाकरिता विविध विभागाच्या परवानगी / ना हरकत करिता एक खिडकी योजना सुरू करण्यात येईल.
- कॅराव्हॅन वाहन नोंदणी करीता परिवहन विभागाकडे आवश्यक ती मदत केली जाईल.

**कॅराव्हॅन पर्यटन धोरणांतर्गत विविध बाबींवर मार्गदर्शन, पर्यवेक्षण, व संनियंत्रण करण्यासाठी राज्यस्तरीय समितीची रचना खालीलप्रमाणे असेल.**

1. प्रधान सचिव (पर्यटन) – अध्यक्ष
2. सचिव (वने)
3. सचिव (जलसंपदा विभाग)
4. आयुक्त (परिवहन विभाग)
5. व्यवस्थापकीय संचालक म.प.वि.म
6. संचालक – राज्य पुरातत्व विभाग
7. संचालक- इको पर्यटन विकास महामंडळ.
8. संचालक (पर्यटन संचालनालय) – सदस्य सचिव.

**समितीची कार्यकक्षा**

1. कॅराव्हॅन पर्यटन धोरणाच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी वेळोवेळी बदल करणे.
2. कॅराव्हॅन संदर्भाच्या नवीन प्रकारांचा समावेश करणे.
3. हायब्रीड कॅराव्हॅन पार्क संदर्भात नवीन बाबींचा समावेश करण्याबाबत निर्णय घेणे.
4. कॅराव्हॅन पर्यटन धोरणाची अंमलबजावणी करणेस स्थळांचा प्राधान्यक्रम निश्चित करणे.
5. पर्यटन धोरणाच्या लाभाच्या अनुषंगाने आवश्यक ते बदल सुचविणे.
6. प्रसिद्धी व प्रचालनासाठी संचालक, पर्यटन संचालनालय यांना मार्गदर्शन करणे.
7. आवश्यकतेनुसार धोरणात बदल सुचविणे विविध विभागांशी समन्वय साधणे.
8. सुरक्षेसंबंधी उपाय सुचविणे.